मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'चिंचवड'मधील मतदान नोंदणीसाठी राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक!

## मतदार नोंदणी अधिकारी देशमुख यांनी केले मार्गदर्शन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

जिल्हा निवडणूक कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड विधानसभा मतदारसंघात जास्तीत -जास्त मतदान नोंदणी व्हावी यासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विविध उपक्रम राबवत आहेत. याचाच एक भाग म्हणून सोमवारी (दि.११) कर संकलन व कर आकारणी विभागाच्या कार्यालयात प्रमुख राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीला भाऊसाहेब दिनकर कुटे, राकेश दिलीप काळे, रवींद्र गजानन यंगड, सागर सुरेश भोर, धनाजी तांबे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), मिलिंद सुरेश कंक, संतोष



गुलाब कलाटे (भारतीय जनता पार्टी), रमेश नरवडे, अशोक वाळके (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपस्थित होते. यावेळी मतदार नोंदणी अधिकारी देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीबाबत माहिती देताना नोंदणी अधिकारी देशमुख म्हणाले निवडणूक आयोगाच्या फॉर्म क्रमांक ९, १०,११, ११ अ आणि ११ ब याविषयी माहिती देण्यात आली. मतदार नोंदणी कार्यालयामार्फत चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ब, ड, ग आणि ह या चार क्षेत्रीय कार्यालय व चिंचवड विधानसभा मतदार नोंदणी कार्यालय येथे प्रत्येक शुक्रवारी फॉर्म क्रमांक ९, १०,११, ११ अ आणि ११ ब प्रसिद्ध करण्यात येत असतात. हे सर्व फॉर्म त्या मतदार नवीन नोंदणी, नावे वगळणे, नावातील दुरुस्ती, पत्ता बदलण्यासाठी जे वेगवेगळ्या प्रकारच्या फॉर्म हे निवडणूक कार्यालयाला प्राप्त होत असतात, त्या फॉर्मचा सारांश हा वरील फॉर्ममध्ये असतो. या पाच ठिकाणची माहिती होण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.

यामध्ये सर्व फॉर्मची सखोल माहिती देऊन त्यांची मतेही जाणून घेण्यात आली. या फॉर्ममधील त्रुटी अथवा यामधील आवश्यक बदल केल्यास मतदार शुध्दीकरणासाठी जास्तीत-जास्त उपयोग होईल, यासह आदी सुचना राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी केल्या. या सूचनांबाबत निवडणूक आयोग व जिल्हा निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागविण्यात येईल, असेही देशमुख यांनी स्पष्ट केले. चिंचवडमध्ये ५१० मतदान केंद्र चिंचवड विधानसभा मतदारसंघात आजमितीस ५१० मतदान केंद्र आहेत. परंतु मतदारांचा वाढता ओघ लक्षात घेता आणि आयोगाने घालून दिलेले निकष विचारात घेता मतदान केंद्रात होणाऱ्या बदलाविषयी व केंद्राच्या संभाव्य वाढी संदर्भात राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना इत्यंभूत माहिती देण्यात आली. तसेच मतदान केंद्र सुसूत्रीकरणाचा सक्षम अधिकारी व आयोगाकडून मान्य झाल्यानंतर सर्व संबंधितांना माहिती देण्यात येईल.

### सहकार्याने काम करणे गरजेचे

**» मतदान यादीचे शुध्दीकरण होणे हे मतदान यंत्रणा व निवडणुकीमध्ये सहभागी होणाऱ्या राजकीय पक्ष व अपक्ष यांच्यासाठी गरजेचे आहे. तसेच परस्पर सहकार्याने काम करणे देखील तितकेच गरजेचे आहे. यासाठी आवश्यक त्या सुचना लेखी स्वरूपात कराव्यात, असे आवाहनही नोंदणी अधिकारी नीलेश देशमुख यांनी केले.**

# छत्रपती शिवाजी महाराजांना शिवप्रेमी शनिवारी देणार मानवंदना

## शिवजयंती समन्वय समिती आणि ढोल ताशा महासंघाने केले आयोजन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकास आणि हिंदू साम्राज्य वर्षास साडेतीनशे वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्त पिंपरी चिंचवड परिसरातील शिवप्रेमी नागरिक शनिवारी (दि.१६ सप्टेंबर) सायंकाळी पाच वाजता निगडी, भक्ती शक्ती चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देणार आहेत. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार छत्रपती उदयन



महाराज भोसले, आमदार छत्रपती शिवेंद्रराजे भोसले ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत अशी माहिती अखिल पिंपरी चिंचवड शिवजयंती समन्वय समितीचे समन्वयक संदीप जाधव यांनी बुधवारी चिंचवड येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी चिंचवड सहकार्यवाह जयंत जाधव, ढोल ताशा महासंघाचे अध्यक्ष विशाल मानकर, शिवजयंती समन्वय समितीचे कुणाल साठे, माजी नगरसेवक शितल उर्फ विजय शिंदे आणि अमित गावडे आदी उपस्थित होते.

अखिल पिंपरी चिंचवड शिवजयंती समन्वय समिती आणि ढोल ताशा महासंघ आणि शिवप्रेमी नागरिकांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. यावेळी ५५ ढोल पथक, ३५० ताशे आणि १००० पेक्षा जास्त ढोल ३५ मिनिटे वाजवून भगव्या ध्वजाची मानवंदना देण्यात येणार आहेत. यावेळी मराठी सुभेदार या चित्रपटाचे कलाकार उपस्थित राहणार आहेत. या भव्य दिव्य कार्यक्रमाला शहरातील शिवप्रेमी बंधू, भगिनी यांनी उपस्थित राहावे असे आयोजकांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# नागेश्वर विद्यालयात किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक समस्या व उपायावर मार्गदर्शन

## किशोरवयीन मुलींनी आरोग्य, आहार व स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घ्यावी





**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** किशोरवयात योग्य मार्गदर्शन लाभले नाहीतर मुलं मुली आपल्या मनात अनेक प्रश्न अनेक शंका मनातल्या मनात दडपून टाकतात चुकीच्या मार्गाने शंकाची उत्तरे शोधतात यामुळे आयुष्यभर त्याचे परिणाम भोगावे लागतात. यामुळे असलेल्या शंका दडपून न ठेवता आपल्या आई आजी सोबत अडचण सांगावी जेणे करून योग्य मार्गदर्शन मिळेल, असे मत डॉ.भाग्यश्री लहाने-मुंढे यांनी व्यक्त केले. मोशीतील नागेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनीसाठी आरोग्य विषयक समस्या, उपाय आणि मार्गदर्शन देण्यात आले. यावेळी प्रा.कविता आल्हाट, वंदना आल्हाट, गणेश सस्ते तसेच प्राचार्य - अप्पासाहेब कळमकर, उप -प्राचार्य - सविता गडहिरे इतर शिक्षकवृंद उपस्थित होते. डॉ.लहाने म्हणाल्या, मुलींचे बालपण संपून तारुण्य सुरू होईपर्यंतच्या संक्रमण कालावधीला सामान्यपणे पौगंडावस्था म्हणतात. किशोरावस्था किंवा कुमारावस्था म्हणून ओळखला जाणारा हा काळ वयाच्या १० ते १८ वर्षांदरम्यानचा असतो. वयात येत असताना मुलींच्या जीवनातील हा काळ त्यांच्या भावी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. मानसोपचार तज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून या अवस्थेला विशेष महत्त्व दिले जाते, त्याची दोन प्रमुख कारणे आहेत, पौगंडावस्थेच्या या काळात मुलींमध्ये मानसिक समस्या निर्माण होऊ शकतात व या समस्यांकडे योग्य रीतीने लक्ष देऊन त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न न झाल्यास मानसिक आणि पर्यायाने शारीरिक रोगांचे प्रमाण वाढू शकते म्हणून किशोरवयीन मुलींनी आरोग्य, आहार व स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घ्यावी. मार्गदर्शन शिबिर यशस्वी करण्यासाठी मोशीतील विठ्ठल क्लिनिक यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन - भारती फुगे यांनी केले.

# त्रिवेणीनगर- तळवडे रस्त्याची कोंडीची समस्या सोडवा

## शिक्षण मंडळाचे माजी सभापती धनंजय भालेकर यांची मागणी



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** तळवडे रस्त्यावरील वाहतुक कोंडीच्या समस्येने वाहनचालक तसेच नागरिक हैराण झाले असून हि वाहतुक कोंडीची समस्या लवकरात-लवकर सोडविण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर (दि.१३ रोजी) पोलीस प्रशासनाचे अधिकारी, वाहतूक विभागाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांची बैठक पार पडली. त्रिवेणीनगर- तळवडे रस्ता विविध कारणांमुळे वाहतूक कोंडीच्या चक्रव्यूहात सापडला आहे. या मार्गावर होणार्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक, प्रवासी व नागरिक त्रस्त होत आहेत. पोलीस प्रशासन,वाहतूक पोलिस तसेच मनपा प्रशासनाने ही समस्या तातडीने सोडविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. याच पार्श्वभूमीवर त्रिवेणीनगर-तळवडे रस्त्यावरील वाहतुक कोंडी संदर्भात वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक डॉ.अमरनाथ वाघमोडे, सहाय्यक पोलिस निरिक्षक निलेश नलावडे, गौरव शिंदे (कनिष्ठ अभियंता), राजु कुंभार (स्थापत्य), श्री.इंगळे, श्री.गवळी ( नगररचना) यांच्या समवेत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिका समवेत बैठक पार पडली.यावेळी वाहतुक कोंडी कमी कशी होईल? त्यासाठी कोण-कोणत्या उपाययोजना करता येतील,या संदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी मा.नगरसेवक शांताराम बापू भालेकर, शिक्षण मंडळाचे माजी सभापती धनंजय भालेकर यांनी आवश्यकतेनुसार वाहतूक पोलीस व ट्रॅफिक वॉर्डनची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी केली. यावेळी मा.नगरसेवक शांताराम भालेकर, मा.शिक्षण मंडळ सभापती धनंजय भालेकर, ज्योतिबा नगर इंडस्ट्रीज इंजिनचे अध्यक्ष ठिकाराम शर्मा, इतर उद्योजक महानगरपालिकेचे नगररचना विभागाचे अधिकारी, स्थापत्य विभागाचे अधिकारी,गणेश मित्र मंडळाचे पदाधिकारी - कार्यकर्ते,गणेश नगर येथील कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिकवर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. त्रिवेणीनगर- तळवडे रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. ज्या ठिकाणी १० मिनिटात पोहचायचे तिथे एक-एक तास पोहचण्यास उशिर होतो आहे. नोकरदारांना, विद्यार्थ्यांना वेळेत रोहचता येत नाही. त्यासाठी लवकरात-लवकर वाहतूक कोडीं फोडावी अशी मागणी माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर यांनी केली. त्रिवेणीनगर- तळवडे रस्ता विविध कारणांमुळे वाहतूक कोंडीच्या चक्रव्यूहात सापडला आहे. या मार्गावर होणार्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक, प्रवासी व नागरिक त्रस्त होत आहेत. नागरिकांना होणारा त्रास बंद होण्यासाठी वाहतूक कोंडी सोडवणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी पोलिस प्रशासन, वाहतूक प्रशासन यांनी तोडगा काढावा अशी मागणी शिक्षण मंडळाचे माजी सभापती धनंजय भालेकर यांनी केली.

### प्रवासी व नागरिक त्रस्त

**» ज्या ठिकाणी १० मिनिंटात पोहचायचे तिथे एक-एक तास पोहचण्यास उशिर होतो आहे. नोकरदारांना, विद्यार्थ्यांना वेळेत पोहचता येत नाही. त्यासाठी लवकरात-लवकर वाहतूक कोडीं फोडावी अशी मागणी माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर यांनी केली. त्रिवेणीनगर- तळवडे रस्ता विविध कारणांमुळे वाहतूक कोंडीच्या चक्रव्यूहात सापडला आहे. या मार्गावर होणार्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक, प्रवासी व नागरिक त्रस्त होत आहेत. नागरिकांना होणारा त्रास बंद होण्यासाठी वाहतूक कोंडी सोडवणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी पोलिस प्रशासन, वाहतूक प्रशासन यांनी तोडगा काढावा अशी मागणी शिक्षण मंडळाचे माजी सभापती धनंजय भालेकर यांनी केली.**

# पुण्यात उद्या अघोषित बंदची चर्चा

## मराठा क्रांती मोर्चाकडून उपोषण; काही भागात बंदची हाक



> बंद पुकारण्यात आलेला नाही. बाणेर, बालेवाडी, बोपोडी, औंध या भागांत बंद आहे. मात्र तेथील व्यवहार सुरळीत राहतील. अन्य ठिकाणी बंद नसून पदाधिकारी केवळ उपोषणाला बसणार आहेत.
>
> -राजेंद्र कोंढरे, समन्वयक, मराठा क्रांती मोर्चा

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** जालना येथील आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी केलेल्या मागण्या राज्य सरकारने तातडीने मान्य कराव्यात. यासह समाजाच्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवारी (१४ सप्टेंबर) पुण्यात मराठा क्रांती मोर्चाकडून सकाळी दहा वाजता मंडई येथील लोकमान्य टिळक पुतळ्याजवळ लाक्षणिक उपोषण केले जाणार आहे. मात्र, गुरुवारी शहरात अघोषित बंद पुकारण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे. मराठा क्रांती मोर्चाकडून बंद नसल्याचे जाहीर करण्यात आले असले तरी शहराच्या बाणेर, बालेवाडी, बोपोडी, औंध या भागांत बंदची हाक देण्यात आली आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावे, या मागणीसाठी जालना येथील आंतरवाली सराटी येथील मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राज्यात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चाकडूनही बुधवारी भूमिका स्पष्ट करण्यात आली. आगामी काळातील गणेशोत्सव लक्षात घेता व्यावसायिक नुकसान टाळण्यासाठी पुणे बंद ऐवजी लाक्षणिक उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

गुरुवारी शहरातील बाणेर, बालेवाडी, बोपोडी, औंध या भागांत बंदची हाक देण्यात आली होती. तेथील मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांबरोबर संपर्क साधून त्याठिकाणचे सर्व व्यवहार सुरळीतपणे सुरू राहतील, याची काळजी घेतली जाणार आहे. याशिवाय, हडपसरमधील बंद मागे घेण्यात आला असून उपोषण आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची एक चित्रफीत प्रसारित झाली आहे. त्यात समाजाला गृहीत धरण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लाक्षणिक उपोषणाच्या वेळी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा निषेध केला जाणार आहे, अशी माहिती मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र कोंढरे, राजेंद्र कुंजीर यांनी पत्रकार परिषदेत दिली. मात्र त्यानंतरही शहर बंद असल्याचे वृत्त बुधवारी रात्री समाजमाध्यमातून प्रसारित झाले. बाणेर, बालेवाडी, बोपोडी, औंध भागातील दुकाने, शाळा बंद राहणार असल्याचे समाजमाध्यमातून सांगण्यात आले. काही ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक होणार नसल्याचेही जाहीर करण्यात आले. तर काही शाळातील क्रीडा स्पर्धाही रद्द करण्यात आल्या आहेत.

# गणेशोत्सवात १८०० 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांची नजर!

## पोलिसांकडून उत्सवाच्या काळात कडक बंदोबस्त



> गणेशोत्सवात हजारो भाविक पुणे शहरात येतात. भाविकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, उत्सवातील गर्दीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे. सार्वजनिक मंडळे, स्थानिक व्यापारी, व्यावसायिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
>
> -रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वैभवशाली परंपरा असलेल्या पुण्यातील गणेशोत्सवात राज्य, तसेच देशाच्या वेगवेगळ्या भागांतून भाविक येतात. उत्सवी गर्दीवर शहरातील १८०० सीसीटीव्ही कॅमेरे नजर ठेवणार आहेत. पोलिसांनी मंडळांच्या कार्यकर्त्यांना मंडपाच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सूचना दिल्या आहेत. उत्सवाच्या काळातील अनुचित घटना, दागिने, मोबाइल चोरीच्या घटना रोखणे तसेच संभाव्य घातपाती कारवायांच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. उत्सवाच्या काळात शहरात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. स्थानिक पोलीस ठाण्यातील कर्मचारी, गुन्हे शाखेची पथके, महिलांच्या सुरक्षेसाठी तयार करण्यात आलेले दामिनी पथक, साध्या वेशातील पोलीस कर्मचाऱ्यांचे पथक शहराच्या वेगवेगळ्या भागात गस्त घालणार आहेत. पुणे पोलिसांनी बसवलेले एक हजार ३०० कॅमेरे, स्मार्ट सिटी योजना, महापालिकेच्या ५०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर उत्सवी गर्दीवर राहणार आहे. शहरात अडीच हजारहून जास्त नोंदणीकृत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. पोलिसांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला आहे. मंडळांनी उत्सवाच्या कालावधीत मंडपाच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. मंडपाच्या परिसरातील रस्त्यांवर कॅमेरे बसवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिवाजी रस्ता परिसरातील बुधवार चौक ते मंडईतील गोटीराम भैय्या चौक दरम्यान उत्सवाच्या कालावधीत भाविकांची मोठी गर्दी असते. मंडई, हुतात्मा बाबू गेनू चौक परिसरात भाविकांची मोठी गर्दी होती. शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता, लक्ष्मी रस्ता, फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्ता, डेक्कन जिमखाना भागात होणारी गर्दी विचारात घेऊन पोलिसांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून गर्दीचे नियंत्रण करणे शक्य होईल. बंदोबस्तावरील पोलीस कर्मचाऱ्यांनी याबाबतच्या सूचना देण्यात येतील. सदाशिव पेठ, नारायण पेठ, शुक्रवार पेठ भागातील अंतर्गत भागातील दुकानदार, व्यावसायिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पोलीस आयुक्तालय, उपायुक्त कार्यालय जोडणी करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयातील मुख्य नियंत्रण कक्षातून उत्सवी गर्दीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे. देशभरात घातपाती कारवाया करण्याच्या तयारीत असलेल्या दहशतवाद्यांना पुणे पोलिसांनी कोथरुड परिसरातून अटक केली. संभाव्य दहशतवादी हल्ला, घातपाती कारवाया विचारात घेऊन पोलिसांकडून उत्सवाच्या काळात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

# पुण्यातील वाहतुकीला लागणार शिस्त!

## बेशिस्त वाहनचालकांच्या परवान्यावर लागणार 'फुली'

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील वाहतुकीची बेशिस्त दिवसेंदिवस वाढत आहे. त्याला आळा घालण्यासाठी वारंवार नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलले जाते. यंदा दरमहा सरासरी शंभर वाहनचालकांचे परवाना ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत. वाहतूक पोलिसांच्या प्रस्तावानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालयाने ही कारवाई केली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते. त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो. जानेवारी ते जून या कालावधीत आरटीओकडून ६१८ वाहनचालकांचे परवाना निलंबित करण्यात आले. त्यात मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमभंगाच्या प्रकाराचा समावेश आहे. आरटीओकडून परवाना निलंबित करण्यात आल्याची माहिती संबंधित वाहनचालकाला ऑनलाइन दिली जाते. परवाना निलंबनाच्या कालावधीत चालक वाहन चालविताना आढळल्यास त्याच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करून त्यांचे वाहनही जप्त केले जाऊ शकते.



### परवाना निलंबित होण्याचे प्रमाण

- » सिग्नल तोडणे : २३७
- » वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे : १७५
- » अतिवेगाने वाहन चालविणे : ४५
- » हेल्मेट न वापरणे : २७
- » मद्यप्राशन करून वाहन चालविणे : २०
- » क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी व मालवाहतूक : ५
- » सीटबेल्ट न वापरणे : १
- » इतर नियमभंग : १०८

**"वाहतूक नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याची शिफारस वाहतूक पोलिसांकडून आरटीओकडे केली जाते. आमच्याकडून दर आठवड्याला अशा वाहनचालकांची यादी पाठविण्यात येते. दरमहा सुमारे शंभर ते दीडशे जणांची नावे पाठविली जातात.**

**-विजयकुमार मगर,**
**पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा**

**"परवाना निलंबनाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांना पुन्हा वाहन चालविता येते. यात केवळ मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांचा अपवाद आहे. त्यांना वाहनाची तंदुरुस्ती तपासणी आणि वाहन चालविण्याची चाचणी पुन्हा द्यावी लागते. त्यानंतर त्यांना पुन्हा परवाना मिळतो.**

**-संजीव भोर,**
**प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी**

# शिंदे, फडणवीस पवारांचा मराठा क्रांती मोर्चाकडून निषेध

## मनोज जरांगे यांच्या मागण्या तातडीने मान्य करा : मराठा क्रांती मोर्चा

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथे मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टपासून आमरण उपोषणास बसले आहेत. मनोज पाटील यांना मंगळवारी उपोषण मागे घेण्याचीही विनंती करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा एक व्हिडीओ समोर आला असून त्यातील विधानाचा मराठा क्रांती मोर्चाकडून निषेध करण्यात आला. मराठा आरक्षणासंदर्भात राज्यस्तरीय बैठक झाल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेपूर्वीचा हा व्हिडीओ असल्याचे सांगितले जाते. व्हिडीओमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेच्या ठिकाणी येताच आपण बोलून मोकळं व्हायचं, निघून जायचं, असं म्हटल्याचं माईकमध्ये रेकॉर्ड झालं. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी त्यांना माईक चालू असल्याची आठवण करून दिली. पुढे अजित पवारही त्यावर येस, येस म्हणताना दिसत आहेत. यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याबाबत मराठा समाजाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. आज पुण्यातील मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या त्या संपूर्ण विधानाचा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र कोंढरे, राजेंद्र कुंजीर, बाळासाहेब अमराळे, सचिन आडेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन निषेध केला. मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक म्हणाले की, मागील कित्येक वर्षांपासून मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी लढा देत आहे. पण कोणत्याही सरकारने मराठा समाजाच्या हिताचा निर्णय घेतला नाही. त्या विरोधात ५८ मोर्चे शांततेच्या मार्गाने काढले. पण काहीच झाले नाही. विधिमंडळात वेगळे, सभेत वेगळे विधान आणि शिष्टमंडळासमोर वेगळी भूमिका मांडण्याचे काम राज्यकर्त्यांनी केले आहे. या सर्व राज्यकर्त्यांनी मराठा समाजासह सर्वांची फसवणूक केली आहे. या सर्व गोष्टींना कंटाळून मनोज जरांगे हे आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसले आहे. आम्ही सर्वजण त्यांच्या पाठीशी आहोत. मनोज जरांगे यांच्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात आणि आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पत्रकार परिषद सुरु होण्यापूर्वी एक व्हिडीओ समोर आला आहे. त्या विधानाचा मराठा समाज निषेध व्यक्त करीत असून मराठा समाजाचा अंत पाहू नये, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकानी राज्य सरकारला दिला.

